महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

---

## कस्तुरचंद पार्क मेट्रो स्टेशन ला एलआयसीचे नाव जोडण्यात आले




नागपूर : कस्तुरचंदपार्क मेट्रो स्टेशनला आजपासून एलआयसीचे नाव जोडण्यात आले असून कस्तुरचंद पार्क एलआयसी मेट्रो स्टेशन म्हणून ओळखले जाईल. महा मेट्रो आणि एलआयसी

आता एकत्र असून काळजी करण्यासारखे काय असे मत भारतीय आयुर्विमा महामंडळाचे क्षेत्रीय व्यवस्थापक (पश्चिम विभाग मुंबई) श्री बी.के. एस. मिश्रा यांनी व्यक्त केले. कस्तुरचंद पार्क एलआयसी मेट्रो स्थानकाच्या नामकरण समारंभातते उपस्थितांना संबोधित करत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री.मिश्रा यांच्या हस्ते नामकरण फलकाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. एलआयसीचे प्रादेशिक व्यवस्थापक (सीसी), (पश्चिम विभागीय कार्यालय, मुंबई) श्री के.जी. दारजी, वरिष्ठ विभागीय व्यवस्थापक श्री. प्रणय कुमार, महामेट्रोचे महाव्यवस्थापक (मालमत्ता विकास), श्री. संदीप बापट यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होते.